N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): नवी मुंबई    P.S.(ठाणे): तळोजा
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0393    Year (वर्ष): 2023
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):20/11/2023 21:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):
1. Day(दिवस): सोमवार    Date From (दिनांक पासून): 20/11/2023
Time Period (कालावधी): पहर 5    Date To ( दिनांक पर्यंत): 20/11/2023
Time From (वेळेपासून): 14:02 बजे
Time To (वेळेपर्यंत): 14:02 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनांक ): 20/11/2023    Time (वेळ): 19:00 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):
Entry No. (नोंद क्र.): 031
Date & Time (दिनांक आणि वेळ): 20/11/2023 21:01 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):
1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पश्चिम, 3 किमी    Beat No. (बिट क्र.):
(b) Address (पत्ता): अ विभाग वा,नावडे, प्रभाग समीती,पनवेल महानगरपालीका, पहिल्या मजल्या ावरील केबीनमध् ,पनवेल जि रायगड
(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मोहम्मद ईक्बाल आदम शेख

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** आदम शेख

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1955

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):** 992647693104

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | B 302,प्लट नं 19, सेक्टर नं 14, ,स्विट सीएचएस कोऑप हौसिंग , वाशी, ,नवी मुंबई,वाशी,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | B 302,प्लट नं 19, सेक्टर नं 14, ,स्विट सीएचएस कोऑप हौसिंग , वाशी, ,नवी मुंबई,वाशी,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9920877936

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विश्राम अभिमन्यु म्हात्रे | | | 1. 419,अंगनवाडी जवळ,खुटारी, पवनेल,तळोजा ,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000/ त्यामध्ये भारतीय चलनाच्या 500 रु. दराच्या 10 | 5,000.00 |



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| | | | चलनी नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद- प्रभाग समिती अ उपविभाग नावडे, वाॅर्ड कार्यालय पनवेल मनपा
दिनांक 20/11/2023

मी मोहम्मद ईक्बाल आदम शेख, वय- 68 वर्षे, सेवानिवृत्त - मुंबई पोर्ट ट्रस्ट, राहणार बी-302, स्विट सी.एच. एस. को.ऑप. हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. 19, सेक्टर नं. 14, वाशी, नवी मुंबई असा असून समक्ष फिर्यादी जबाब लिहुन देतो की,
मी वर नमुद प्रमाणे असुन वरील पत्त्यावर सन 2005 पासून माझे कुटूंबियांसह राहण्यास आहे. मी सन 2013 मध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट येथून गोदाम अधिक्षक या पदावरुन सेवानिवृत्त झालो आहे.
मी सन 2014 मध्ये मेसर्स रिधम डेव्हलोपर्सचे प्रोप्रायटर श्री. दिलीपकुमार जसवंतराज शाह यांच्याकडून पत्रा शेड नं. पी-23, बालाजी इंडस पार्क सर्व्हे नं. 119/1, 119/2, 120/2, 120/3, 121/1 व 121/2 मौजे तोंडरे ता. पनवेल, जि. रायगड येथील सुमारे 661 चौ. फुट क्षेत्रफळाचा व्यवसायिक गाळा विकत घेतला होता. सदरचा गाळा खरेदी केलेबाबत स.दु.नि. पनवेल-5 येथे दस्त नोंदणीकृत करण्यात आला असून त्याचा दस्त क्र. 6808/2014, दि. 11/10/2014 असा आहे. सदर दस्त नोंदणी झाल्यानंतर शासकीय नियमाप्रमाणे मी वरीलप्रमाणे असलेल्या गाळ्याची नोंद तोंडरे ग्रामपंचायत याठिकाणी केली होती.
सन 2018 मध्ये पनवेल महानगर पालिका स्थापन झाल्यानंतर मौजे तोंडरे, ता. पनवेल, जि. रायगड ही ग्रामपंचायत पनवेल महानगर पालिकामध्ये विलीन करण्यात आली. त्यानंतर सदर महानगर पालिकेत समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतीच्या अभिलेखांच्या नोंदी ऑनलाईन पध्दतीने पनवेल महानगर पालिका येथे झालेल्या आहेत. त्यानंतर सन 2022 मध्ये पनवेल महानगर पालिका यांच्याकडून उपरोक्त गाळयाचा मालमत्ता करबाबत पावती प्राप्त झाली. सदर पावतीवर गाळ्याचे प्राथमिक कर धारक म्हणून मेसर्स रिधम डेव्हलोपर्स अशी नोंद असल्याचे मी पाहिले. त्याबाबत चौकशी करण्याकरीता मी पनवेल महानगर पालिका येथील मालमत्ता कर विभागात जावून चौकशी केली असता, सदर ठिकाणी असलेले कर्मचारी यंानी मला मालमत्ता कराची रक्कम प्रथम भरण्यास सांगून गाळ्याचे मालमत्ता कर पावती माझे नावे करणेकरीता खरेदी कागदपत्र जमा करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 27/07/2022 रोजी मालमत्ता कराची रक्कम रू. 67,799/- इतकी रक्कम आॅनलाईन भरणा केली आहे. त्यानंतर मला सांगितलेप्रमाणे मी दिनांक 03/10/2022 रोजी मालमत्ता कर निर्धारण विभाग, पनवेल महानगर पालिका नावडे प्रभाग कार्यालय येथे समक्ष जावून गाळयाचे मालमत्ता कर पावती माझे नावे होणेबाबत लेखी अर्ज सादर केला आहे. त्याअर्जाच्या अनुशंगाने मी पुढील आठ ते दहा दिवसांनी कार्यालयात जावून अर्जाबाबत, त्याठिकाणी असलेल्या श्रीमती म्हात्रे यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी माझे अर्जावर पुढील काही दिवसात कार्यवाही करून गाळयाची मालमत्ता पावती लवकरच माझे नावावर करण्यात येईल असे आश्वासन दिले.
त्यानंतर मी वेळोवेळी सदर कार्यालयात जावून माझे अर्जाबाबत चौकशी केली असता, पनवेल महानगर पालिका नावडे प्रभाग कार्यालय येथील वाॅर्ड अधिकारी श्री. विश्राम म्हात्रे यंानी आॅनलाईन अर्ज करण्यास सांगून मला समक्ष भेटण्यास बोलाविले. त्याप्रमाणे मी दिनांक 18/09/2023 रोजी आॅनलाईनव्दारे पनवेल महानगर पालिका यांचे पोर्टलवर अर्ज करून हस्तांतरण व पेपर फी अशी मिळून रू. 4,300/- इतकी रक्कम आॅनलाईन अदा केली. त्यानंतर मी, श्री. विश्राम म्हात्रे यांची पनवेल महानगर पालिका येथे दिनांक 25/10/2023 रोजी फोन करून भेट घेतली असता, वाॅर्ड अधिकारी श्री. विश्राम म्हात्रे यांनी पावती माझे नावे करण्यासाठी रू. 5,000/- इतक्या



Scanned with OKEN Scanner

रक्कमेची मागणी केली. सदरवेळी नमुद रक्कम " कायदेशीर फी आहे का? व ती रक्कम आॅनलाईन भरू का?" अशी विचारणा मी, श्री. म्हात्रे यांना केली असता, त्यांनी मला "नाही " असे बोलून कॅश घेवून येण्यास सांगितले. त्यावेळी श्री. म्हात्रे यांना महत्वाचे बैठकीकरीता जायचे असल्याने सविस्तर बोलणे टाळले व मला पुन्हा येवून भेटण्यास सांगितले. त्यानंतर मी व्हाॅट्सपव्दारे श्री. म्हात्रे याच्याकडे माझे पावतीचे अनुशांगाने चौकशी केली असता, दिनांक 09/11/2023 रोजी श्री. म्हात्रे यांनी मला 10 ते 15 दिवसांनी कार्यालयात येवून भेटण्यास सांगितले.

पनवेल महानगर पालिका नावडे प्रभाग कार्यालय येथील वाॅर्ड अधिकारी श्री. विश्राम म्हात्रे यांनी मागणी केलेली रक्कम ही लाच असून सदरची रक्कम मी त्यांना दिली नाही तर ते माझे गाळयाचे मालमत्ता कर पावती माझे नावावर करण्यास दिरंगाई करतील अथवा व्यत्यय आणतील अशी माझी खात्री झालेली आहे. वाॅर्ड अधिकारी श्री. विश्राम म्हात्रे यांनी त्याचेकरीता मागणी केलेली रू. 5,000/- लाचेची रक्कम त्यांना देण्याची माझी इच्छा नसल्याने पनवेल महानगर पालिका नावडे प्रभाग कार्यालय येथील वाॅर्ड अधिकारी श्री. विश्राम म्हात्रे यांच्या विरूध्द कायदेशीर कारवाई होणेबाबत मी दिनांक 16/11/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात समक्ष हजर राहून तक्रार दिली होती.

त्याअनुशंगाने पुढील कारवाई करणेकरीता दिनांक 16/11/2023 रोजी उप प्रादेशीक परिवहन कार्यालय, वाशी, नवी मुंबई येथील कार्यालयाकडुन आलेल्या दोन शासकीय पंचांशी पोनि संतोष पाटील यांनी माझी ओळख करून देवुन, माझे तक्रारीची हकिगत पंचांना समजावुन सांगीतली.

त्यानंतर दिनांक 16/11/2023 रोजी लाचेच्या मागणीचे पडताळणी दरम्यान मी, डिजीटल व्हाईस रेकाॅर्डरसह पंच साक्षीदार यांचेसमवेत वाॅर्ड अधिकारी श्री. विश्राम म्हात्रे यांची वाॅर्ड कार्यालयात भेट घेतली. त्यावेळी वाॅर्ड अधिकारी श्री. विश्राम म्हात्रे हे "झाल ते माझ अॅप्रुअल झालं साहेबांच अॅप्रुअल बाकी आहे ते अॅप्रुअल झाल की तुमच काम होवुन जाईल ...ट्रान्सफरसाठी..पण हा ते...... " असे मला बोलून त्यांचे उजव्या हाताची पाच बोटे मला दाखवित " साहेबाला दयायला लागतील हा " असे सांगितले. त्यावर मी अच्छा असे बोलून होकार दर्शविला असता, श्री म्हात्रे यांनी " पाच दया ... पाच " असे मला सांगितले. त्यावर मी" पाच काढावे लागेल " असे बोलून " पाच म्हणजे किती..?" अशी विचारणा केली असता, श्री म्हात्रे यांनी " पाच हजार " असे सांगितले. त्यावर मी " पाच हजार ... येवु अर्ध्या तासात येवु अर्ध्या तासात " असे बोलून त्यांचे केबिनमधून बाहेर आलो.

अशा प्रकारे वाॅर्ड अधिकारी श्री विश्राम म्हात्रे यांनी माझेकडे रू.5,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून सदरची रक्कम अर्ध्या तासामध्ये घेवून येण्यास सांगितले होते.

त्याअनुशंगाने दिनांक 16/11/2023 रोजी लगेच श्री. म्हात्रे यांच्याविरूध्द लाचेचा सापळा आजमविण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी पोनि संतोष पाटील यांनी मला लाचेच्या सापळा कारवाई करीता लाचेची रक्कम रू. 5,000/- हजर करण्यास सांगितले असता, मी जवळच असलेल्या ए.टी.एम. मधून माझे खात्यावरून रू. 5,000/- त्यामध्ये रू. 500/- दराच्या 10 चलनी नोटा काढुन सदरच्या नोटा लाचेची रक्कम म्हणून पोनि संतोष पाटील यांच्याकडे हजर केली. त्यावेळी खाजगी वाहनामध्ये सापळापुर्व कारवाई पुर्ण करण्यात आली. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान मी पंच साक्षीदार यांचेसह लाचेची रक्कम घेवून लोकसेवक श्री. विश्राम म्हात्रे यांचे पनवेल महानगरपालिका, नावाडे प्रभाग कार्यालय येथे गेलो असता, सदर ठिकाणी असलेल्या शिपायाने श्री. म्हात्रे हे कार्यालयातुन निघून गेले असल्याचे सांगितले. त्यावेळी मी माझे मोबाईल नं. 9920877936 वरून वाॅर्ड अधिकारी श्री. विश्राम म्हात्रे यांचे मोबाईल नं. 8879306039 वर फोन करून मोबाईलचा स्पिकर चालू केला. त्यावेळी मी म्हात्रे यांना त्यांचे कार्यालयात आलो असल्याचे सांगितले असता, त्यांनी ते निघून गेले असल्याचे सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक यांना " मी उदया तुमचा टाईम सांगा उदया येतो .... दुपारी किती वाजता येवु " असे बोलत " दुपारी अकरा वाजता सकाळी अकरा वाजता येवु " अशी विचारणा केली असता, वाॅर्ड अधिकारी श्री. म्हात्रे यांनी " हो चालेल चालेल " असे बोलत होकार दिला होता.

वाॅर्ड अधिकारी विश्राम म्हात्रे, हे त्यांच्या कार्यालयातुन निघून गेल्याने तसेच त्यांनी मला दिनांक 17/11/2023 रोजी येण्यास सांगितले असल्याने सदरचा सापळा काढून घेण्यात आला. तसेच पुढील कार्यवाहीकरीता दिनांक 17/11/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात हजर राहण्याबाबत मला सुचना देण्यात आल्या होत्या.

त्याप्रमाणे दिनांक 17/11/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात हजर झालो त्यावेळी पंच साक्षीदार यांचेसमक्ष सापळापुर्व कार्यवाही पुर्ण करण्यात आली. त्यानंतर लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान मी डिजीटल व्हाईस रेकाॅर्डरसह लाचेची रक्कम घेवून पंच नं. 1 श्री. अक्षय जाधव यांचेसह श्री. विश्राम म्हात्रे यांना पनवेल महानगरपालिका, नावडे प्रभाग कार्यालय येथे जावून भेटलो. त्यावेळी श्री. विश्राम म्हात्रे यांनी माझेकडे



Scanned with OKEN Scanner

प्रा◌ॅपटींचे बाबत चौकशी केली त्यावेळी मी त्यांना माझेकडील कागदपत्रे दाखविले असता, त्यांनी नमुद कागदपत्रांच्या अनुशंगाने संगणकावर खात्री करून मला ' सोमवारी होईल' असे सं◌ागितले. त्यावर मी, श्री विश्राम म्हात्रे यांचेकडे निष्चितपणे सोमवारीच होईल का याबाबत खात्री करण्याकरीता विचारणा करीत असता, त्यांचे केबिनमध्ये इतर व्यक्ती असल्याने ते मला " या या उदया या" असे बोलले. त्यावर मी त्यांना 'थांबू का? ' 'सोमवारी येवू' अशी विचारणा करता, त्यांनी मला " सोमवारी...नका येवू, फोन करा मोबाईलवर पी.डी.एफ. पाठवितो तुम्हाला " असे सांगितले.

त्याप्रमाणे आज रोजी मी पोर्टलवर आ◌ॅनलाईन पाहणी केली असता, माझे गाळ्याचे मालमत्ता कर पावतीवर माझे नावाची नोंद झालेली नाही. त्याबाबत चौकशी करण्याकरीता मी विश्राम म्हात्रे यांना फोन केला असता, त्यांनी फोन रिसीव्ह केला नाही तरोच श्री विश्राम म्हात्रे यांनी मला ठरल्याप्रमाणे माझे मोबाईलवर पिडीएफ देखील पाठवलेली नव्हती. त्यामुळे श्री विश्राम म्हात्रे हे त्यं◌ानी माझेकडे मागीतलेली रक्कम रू. 5000/- घेतल्याशीवाय माझे काम करणार नाहीत अशी माझी खात्री झाल्याने मी अ◌ेसीबी नवी मुंबई कार्यालयात जावुन पो.नि. ◌संतोष पाटील यांना सदर हकिकत सांगीतली. त्यावेळी पो.नि. संतोष पाटील यांनी मला पुन्हा विश्राम म्हात्रे यांची भेट घेवुन कामाच्या अनुशंगाने चर्चा करणेस तरोच दि. 16/11/2023 रोजीच्या आमचेमधील संभाषणा दरम्यान श्री. म्हात्रे यांनी उल्लेख केलेल्या साहेबां बाबत सविस्तर चौकशी करण्याबाबत सुचना दिली व पुन्हा सापळा आजमाविण्याचे ठरवीले.

त्यानुसार अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात पंच साक्षीदार यांचेसमक्ष सापळापुर्व कारवाई पुर्ण करण्यात आली. त्यानंतर लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान मी डिजीटल व्हाईस रेका◌ॅर्डरसह लाचेची रक्कम घेवून पंच नं. 1 श्री. अक्षय जाधव यांचेसह श्री. विश्राम म्हात्रे यांना पनवेल महानगरपालिका, नावडे प्रभाग कार्यालय येथे जावून भेटलो. त्यावेळी श्री. विश्राम म्हात्रे यांचेकडे माझे कामाबाबत चौकशी केली असता त्यांनी " आपल्याकडुन झाले......तिकडे साहेबांचे राहिले.....साहेबांच फक्त......साहेबांच झालं की लगेच करून देतो...प्रिंन्ट माझेकडेच आहे त्याची.... त्यांचा अ◌ॅप्रुअल लागतो......असे मला बोलले. त्यावर मी त्यांना ठीक आहे..... प्रिंन्ट तुंम्हीच काढणार आहेत..... आणि मग ते खारघरला बसतात वा◌ॅर्ड आ◌ॅफिसर त्यांना दयायच आहे.... त्यांचे सॅक्षन बाकी आहे. असे मी त्यं◌ाना बोललो असता विश्राम म्हात्रे हे त्यांचं बाकी आहे असे मला बोलले. त्यावेळी श्री विश्राम म्हात्रे यांनी मला हाताचे इशा-याने लाचेच्या रकमेसंबधाने खुनावले असता, मी अच्छा....तुम्ही सांगीतल्याप्रमाणे आणलेत....असे बोललो असता वा◌ॅर्ड अधिकारी विश्राम म्हात्रे यांनी लाचेची रक्कम देण्याबाबत मला हाताने इषारा केला असता, मी लाचेची रक्कम रू. 5000/- उजव्या हाताने पुढे केली तेव्हा विश्राम म्हात्रे यांनी लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारून त्यांचे दालनामधील टेबलच्या ड◌ा◌वरमध्ये ठेवली. त्यावेळी मी त्यांना मोजुन घ्या.... मोजुन घ्या... असे बोलल असता ते हा.... आहे. असे बोलले. त्यानंतर मी केबीनच्या बाहेर येवुन माझ्या डोक्यावरील टोपी काढून पुर्वनियोजित इशारा केला त्यावेळी सापळा पथकाने श्री विश्राम म्हात्रे यांना 14.02 वा. ताब्यात घेतले.

त्यानंतर श्री विश्राम म्हात्रे यांचेविरुध्द प्रभाग समिती अ उपविभाग नावडे वार्ड कार्यालय पनवेल महानगरपालीका पहिला मजला येथे सापळा पंचनामा कारवाई पुर्ण करण्यात आली

तरी श्री विश्राम अभिमन्यु म्हात्रे वय-36 वर्षे लिपीक, अतिरिक्त कार्यभार वार्ड अधिकारी (वर्ग3) उपविभाग नावडे वार्ड कार्यालय पनवेल महानगरपालीका रा. मु.पो खुटारी घर नं. 419, अंगणवाडी जवळ, ता. पनवेल जि. रायगड यांनी दि. 16/11/2023 रोजी लाचेच्या मागणी च्या सत्यता पडताळणी कारवाई दरम्यान माझे मौजे तोंडरे ता. पनवेल जि. रायगड येथील बालाजी इन्डस पार्क मधील P-23, या गाळ्याचे मालमत्ता कर पावतीवर माझ्या नावाची नोंद घेण्यासठी माझेकडे स्वत साठी त्यांचे वरिष्टांकरिता रु 5000/- लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे निषन्न झाले त्यानंतर दि. 20/11/2023 रोजी लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान माझेकडून रु 5000/- स्विकारले असता श्री विश्राम अभिमन्यु म्हात्रे यांना भाग समिती अ उपविभाग नावडे वार्ड कार्यालय पनवेल महानगरपालीका येथील पहिल्या मजल्यावरील केबीनमध्ये लाचेच्या रक्कमेसह 14.02 वा. सापळा पथकाने रंगेहाथ ताब्यात घेतले आहे. म्हणुन माझी श्री विश्राम अभिमन्यु म्हात्रे वय-36 वर्षे लिपीक, अतिरिक्त कार्यभार वार्ड अधिकारी (वर्ग3) उपविभाग नावडे वार्ड कार्यालय पनवेल महानगरपालीका यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

मला मराठी भाषा लिहता येत नाही परंतु मला मराठी भाषा चांगल्या प्रकारे वाचता येते व समजते माझा वरिल फिर्यादी जबाब मराठीत माझे समक्ष संगणकावर टंकलिखीत केलेला असुन तो मी वाचून पाहिला असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): AMBIKA ASHOK ANDHARE

**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 15101000402AA

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Mohd Iqbal 28/11/2025

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

(अंबिका अधारे)

**Name** (नाव): AVINASH EKNATH K

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner